# मशरूम शेती व्यवसायामुळे कुटुंबाला आधार

दिनांक २७.१२.२०१६ ला मंगरूळपिर क्लस्टर अंतर्गत **Activity 2.5.3.7 Training of farmers producers** या DPR activity नुसार मशरूम कल्टीव्हेशन प्रशिक्षण घेण्यात आले या प्रशिक्षण ला महिला बचत गट प्रतिनिधी, शेतकरी, ग्रामकार्यकर्ता या गटातील सावरगाव, मंगलसा, वाडा, जोगलदारी, चांदई, मुर्तीजापुर, बोरव्हां या गावातील एकूण ४५ प्रतिनिधींनी मशरुम प्रशिक्षण घेतले होते.

या प्रशिक्षणाला प्रशिक्षक म्हणून भारत मशरूम युनीट, गव्हानिपानी ता. धामणगाव (रेल्वे) येथील श्री. भाम्बुरकर यांनी मशरूम कल्टीव्हेशन प्रशिक्षण दिले यामध्ये धिंगरी अळम्बा शिपाल्याच्या आकाराचे मशरूम या बद्दल माहिती दिली या मध्ये जागेची निवड कशी करायची, मशरूम तयार करण्यासाठी तापमान किती आवश्यक आहे, जागेचे निरजंतुकीकरण कसे करायचे, या साठी कुटार कोणत्या प्रकारचे असायला पाहिजे, त्याचप्रमाणे मशरूम तयार करतांना किती दिवसाचा कालावधी लागतो व प्रत्येक दिवसाला कशी काळजी घ्यायची त्याचप्रमाणे मशरूम साठी कोणत्या प्रकारचे बियाणे वापरले पाहिजे व मशरम ला मागणी कुठे आणि कशी आहे या बद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी मशरूम कसे तयार केले जाते या बद्दल Demo करून दाखविले व सर्व सहभागींना किट देण्यात आली.

मशरुम किट सर्व लोकांना दिल्यामुळे सर्वांनी आप-आपल्या घरी मशरुम कसे तयार करायचे या बद्दल डेमो तयार केले आहे आजच्या परिस्थीतीला ते मशरुम अतीशय चांगल्या प्रकारे तयार झालेले आहे.

मुर्तीजापुर येथील सौ. सविता तायडे( ग्रामकार्यकर्ता) यांच्या घरी भेट दिली असता त्यांनी तयार केलेले मशरुम पाहिले हे मशरुम अतीशय चांगल्या प्रकारे तयार झालेले होते आणि ते विकण्यासाठी सुध्दा तयार झालेले आहे असे दिसुन आले.आज त्यांच्या घरी अनेक लोकांनी मशरुम पाहण्यासाठी भेटी दिलेल्या आहे यामध्ये महिला बचत गटातील एकुन ८ महिलांनी हा व्यवसाय सुरु करण्याचे ठरविलेले आहे. त्यासाठी त्यांनी जागेची निवड सुध्दा केलेली आहे. यामध्ये एका महिण्यामध्ये १० किलो मशरुम तयार करण्याचे प्रत्येक महिलांनी ठरविलेले आहे. मशरुमचे प्रती किलो ७५० रुपये दर असल्यामुळे महिलांना ७५०० रुपये एवढे उत्पन्न दर महिण्याला मिळेल त्याचप्रमाने मशरुम विकत घेण्यासाठी मार्केट उपलब्ध असल्यामुळे त्याचप्रमाने कमी खर्चात हा व्यवसाय सुरु करता येत असल्यामुळे महिलांना हा व्यवसाय करणे अतीशय फायदेशीर ठरणार आहे. अशाच प्रकारे ज्या गावातील लोकांनी मशरुम चे प्रशिक्षण घेतलेले आहे त्या गावातुन मशरुम व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रस्ताव येत आहे त्यामुळे प्रत्येक्षात अनुभव घेतलेल्या मशरुम शेती मुळे अनेक कुटुंबाला आधार मिळणार आहे यामुळे हा व्यवसाय मंगरुळपिर क्लस्टर मधील यशस्वी व्यवसाय होईल अशी अपेक्षा आहे.